## जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे

## कनिष्ठ लिपीक या पदाकरीता भरती प्रक्रि या – २०२३

### –: मराठी व इंग्रजी टंकलेखन चाचणीकरीता सूचना :–

१. उमेदवारांनी परिक्षा हॉलमध्ये येतांना मोबाईल, पेनड्राईव्ह, कॅल्क्युलेटर, स्मार्ट वॉच, ब्लु–टुथ इत्यादी जवळ बाळगु नयेत. तसेच उमेदवारांना त्यांचेकडील संगणकाचे साहित्य उदा. की–बोड, माऊस इत्यादी वापरण्यास सक्त मनाई आहे.

२. उमेदवारांनी स्वतःचे मुळ ओळखपत्र सोबत बाळगणे आवश्यक आहे तसेच प्रशासनाकडून ज्यावेळेस मागणी केली जाईल त्यावेळी दाखवणे आवश्यक आहे.

३. उमेदवारांच्या परीक्षेबाबतची सर्व माहिती जिल्हा न्यायालय, धुळे यांचे खालील अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी अद्ययावत केली जाईल. उमेदवारांनी खालील संकेतस्थळावरील परीक्षेच्या माहितीबाबत अद्ययावत राहावे.

OFFICIAL WEBSITE OF DISTRICT COURT, DHULE

https://dhule.dcourts.gov.in/notice-category/recruitments/

४. उमेदवाराने आपापल्या जागेवर बसण्यापूर्वी टेबलावर नमुद केलेला रोल नंबर आपल्या बॅचनुसार स्वतःचा असल्याची खात्री करावी.

५. पर्यवेक्षकांनी दिलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करावे. उध्दट वर्तन व असहकार्य करणा–या उमेदवारांस परिक्षा केंद्रामधुन त्वरीत बाहेर काढले जाईल.

६. आपल्या समोरील संगणक चालू स्थितीमध्ये असेल. संगणकाचे अथवा विद्युत जोडणीचे कोणतेही बटन दाबू नये तसेच इतर कोणतेही ॲप्लीकेशन, विंडो, फोल्डर तसेच फाईल इत्यादी ओपन करु नये.

७. सगंणकावर टंकलेखन उतारा टाईप करण्यासाठीची फाईल अगोदरच ओपन केलेली असेल त्याचा पेज –सेटअप तयार करुन ठेवलेला असेल (उदा. पेज सेटिंग, फॉन्ट, मार्जिन, लाईन मधील स्पेसिंग इत्यादी) पेज सेटअपमध्ये कुठल्याही स्वरुपाचा बदल उमेदवाराने करु नये. संगणकामध्ये अथवा संगणकाच्या सेटींगमध्ये कोणताही बदल केल्यास व त्यामुळे मजकुराची प्रिंट बिघडल्यास अथवा इतर कोणतीही अडचण उद्भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसेच भरती प्रक्रियेतून उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

८. उमेदवार त्याचे जागेवर बसल्यानंतर त्याला त्याचे सगंणकाच्या स्क्रीनवर फाईल ओपन दिसेल त्यामध्ये उमेदवारांनी खालील माहिती भरावी.

९. रोल नंबर या रकान्यात आपणांस जिल्हा न्यायालयातर्फे जो रोल क्रमांक देण्यात आलेला आहे तो टंकलिखित करावा.

१०. आवेदन क्रमांक (Application No.) या रकान्यामध्ये JC च्या पुढे आपला आवेदन क्रमांक काळजी पूर्वक टंकलिखित करावा.

११. उतारा टंकलिखित करावयाची वेळ संपल्यानंतर उमेदवारांनी सदरहु फाईल पी.डी.एफ. करावी व पी.डी.एफ. केलेली फाईल आपला रोल नंबरने सेव्ह करावी. त्यानंतर सदर पी.डी.एफ. उता–याची प्रिंट काढल्यावर उमेदवाराच्या स्वाक्षरी या रकान्यात उमेदवारांनी त्यांची स्वाक्षरी करावी.

१२. सदरील माहिती अचूक असल्याची खात्री उमेदवाराने करावयाची आहे. चुकीच्या माहितीमुळे उमेदवाराचे नुकसान झाल्यास त्यासाठी उमेदवार स्वतः जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

१३. उमेदवारांनी टाईप केलेला मजकूर वेळोवेळी सेव्ह (save) करण्याची दक्षता घ्यावी. त्याची जबाबदारी स्वतः उमेदवाराची राहील.

१४. टाईप केलेल्या उता–याची प्रिन्ट उमेदवारांनी तपासावी व ती बरोबर असल्याची खात्री झाल्यानंतरच त्यावर उमेदवारांनी योग्य त्या ठिकाणीच स्वाक्षरी करावी.

१५. उमेदवारांनी त्याच्या उत्तरपत्रीकेची एकच प्रिंट काढावयाची आहे. प्रिंट निघण्यास कोणतीही अडचण आल्यास उमेदवारांनी पर्यवेक्षकांची मदत घ्यावी. वारंवार प्रिन्ट कमांड देऊ नयेत.

१६. परीक्षा संपल्यानंतर उमेदवाराने आपल्या जागेवरच बसून रहावयाचे आहे. पर्यवेक्षक आपल्याकडून उत्तर पत्रीका त्यांचे ताब्यात घेतील. त्याची तपासणी पुर्ण झाल्यानंतर आपणांस बाहेर जाणेसाठी सुचना देण्यात येतील त्यानंतरच उमेदवाराने जागेवरुन उठून बाहेर जावे.

Manand
०५/११/२४

जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे }
दिनांक ०४/११/२०२४ }

( माधुरी आनंद )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, धुळे तथा
अध्यक्षा भरती समिती धुळे